**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. १३.५.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९ / सातारा |
| २ | अपीलकर्ता | श्री. दिपक बाळासाहेब शिर्के<br>रा. नवीन मार्केट यार्ड शेजारी, यशवंतनगर,<br>वाई, ता. वाई, जि. सातारा |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक, नगररचना, सातारा, जि. सातारा |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उप संचालक, नगररचना, सातारा, जि. सातारा |
| ५ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती | विकास आराखड्यातील केलेल्या बदलाबद्दल, वाई शहराच्या मंजूर विकास योजनाबाबत व तद्अनुषंगाने माहिती |

शासकीय माहिती अधिकारी तथा सहाय्यक संचालक, नगररचना, सातारा यांनी त्यांचे कार्यालयामधील अभिलेखात उपलब्ध असणाऱ्या माहितीनुसार माहिती पुरविली असल्याने चुकीची माहिती दिली हे अपीलकर्त्याचे म्हणणे योग्य व संयुक्तिक वाटत नाही, असे अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे. तसेच अपीलकर्त्याची स.क्र. १/७ब मधील नियोजित रस्त्याच्या रेखांकनाची तक्रार ही माहितीच्या अधिकारात येत नसून त्यासाठी महसूल अथवा नगरविकास विभागाकडे तक्रार अर्ज करू शकतात, असे अपीलकर्त्यास स्पष्ट केल्याचे जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी नमूद केले आहे.

अपीलकर्ता, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे म्हणणे विचारात घेता, कागदपत्रांमधील नोंद दुरूस्त करणे हा प्रशासकीय कार्यवाहीचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. विकास आराखड्यातील रचनेमध्ये बदल करण्याचे अधिकार नगररचना, सातारा या कार्यालयास आहेत की नाही, याची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेली नाही, ती अपीलकर्त्यास आठ दिवसांत निःशुल्क द्यावी व त्याबाबतचा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. ६.६.२००८**

(सही)
**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

(शिक्का: राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ)

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. सत्त्वशील धैयशील शेळके
मु.पो.लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा — अपीलकर्ता

विरुध्द

अपिलीय प्राधिकारी तथा
तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा

उत्तरवादी

जन माहिती अधिकारी तथा
निवासी नायब तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २४.१०.२००७ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** : श्री. सत्त्वशील धैयशील शेळके
मु.पो.लोणंद, ता. खंडळा, जि. सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ३०.१०.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २७.११.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१२.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

८ **मुळ अर्जात मागणी केलेली माहिती**

मौजे लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा येथील स.क्र.२७९/२/२ या क्षेत्रातील ७/१२ वरचे ०.४२ आर क्षेत्र पुनर्वसन संपादित करीत असताना कोणकोणत्या सहहिस्सेदारांना व लगतदारांना

नोटिसा पाठवून कळविले याची माहिती व त्या क्षेत्रातील कोणत्या व्यक्तीचे नाव कमी होऊन महाराष्ट्र शासन, जिल्हाधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे नाव लागले. तसेच ०.४२ आर क्षेत्र संपादन करून घेतले, त्यावेळी ते नाव कसे कमी झाले व संपादन पुनर्वसनाने केले त्यांचे नाव कसे लागले, याची सविस्तर माहिती, व ज्या व्यक्तीचे संपादन पुनर्वसनाने केले, त्याचे पैसे त्या व्यक्तीला दिले गेले का, याची माहिती

## विवेचन

चुकीची कब्जेपट्टी झाल्याबाबत अपीलकर्ता श्री. सत्त्वशील धैर्यशील शेळके यांनी जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, खंडाळा यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीने समाधान न झाल्याने श्री. शेळके यांनी अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा, जि. सातारा यांच्याकडे अपील केले. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी त्याची दखल घेतली नाही, याच विषयावरील अन्य अर्जांबाबतचे अपील फेटाळले. म्हणून श्री. शेळके यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

पुनर्वसन प्रक्रिया चुकीच्या पध्दतीने राबविली गेली व त्यामुळे ०.४२ आर क्षेत्र चुकीच्या पध्दतीने संपादन केले गेले, असे श्री. शेळके यांचे म्हणणे आहे. (त्यांनी ०.४२ आर व ०.४३ आर असे वेगवेगळे उल्लेख अर्जात व अपिलात केले आहेत.) जादा संपादित केलेल्या केलेल्या क्षेत्राची आर्थिक भरपाई मिळण्याबाबतचा प्रश्न त्यांनी मांडलेला आहे. गाव कामगार तलाठी, लोणंद यांनी वेगवेगळे उतारे दिले आहेत, तीन वेगवेगळी प्रपत्रे आपल्याला देण्यात आली असून आपल्या वडिलांचे निधन झाले असतानाही पंचनाम्यात त्यांचे नाव घालून खोटा पंचनामा केला आहे, असे श्री. शेळके यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले. पुनर्वसन प्रक्रिया तहसीलदारांमार्फत होत नाही, ही प्रक्रिया प्रांताधिकाऱ्यांकडून (उपविभागीय अधिकारी ) झाली आहे, त्यांच्याकडे तक्रार करावी, असे आपण श्री. शेळके यांना वारंवार सांगितले आहे, असे तहसीलदार, खंडाळा श्री. जी.एस. सांगडे यांनी नमूद केले. आपल्याकडील उपलब्ध असलेली सर्व कागदपत्रे त्यांना देण्यात आली असून श्री. शेळके यांचे त्याने समाधान झाले नसल्यामुळे ते वारंवार आपल्या कार्यालयाकडे माहितीच्या अधिकारात व अन्य प्रशासकीय स्वरूपाचे अर्ज करीत असतात. याच संदर्भात त्यांनी सन २००६ मध्ये १८ व सन २००७ मध्ये २८ अर्ज असे एकूण ४६ अर्ज केल्याचा तपशील श्री. सांगडे

यांनी सादर केला असून श्री. शेळके यांना या सर्व अर्जांमधील माहिती दिली असल्याचे अहवालात नमूद केले आहे.

पुनर्वसन प्रक्रिया योग्य की अयोग्य, तसेच कब्जेपट्टी चुकीची की बरोबर हे तपासणे, योग्य ती दुरूस्ती करणे - न करणे हा माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेतील विषय नाही. मात्र गाव कामगार तलाठी, लोणंद, यांनी तफावत असलेले उतारे देणे, श्री. शेळके यांच्या वडिलांचे निधन झाले असताना पंचनाम्यात त्यांचे नाव नोंदविले गेले का, व माहिती असत्य आहे का, याबाबत तहसीलदार, खंडाळा यांनी तपासणी करून वस्तुस्थितीची माहिती देणे आवश्यक आहे.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेले कागदपत्रे लक्षात घेता आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

## आदेश

१. अपील अमान्य.

२. गाव कामगार तलाठ्याने दिलेले वेगवेगळे उतारे, पंचनाम्याच्या नोंदीबाबतची वस्तुस्थिती याची तपासणी करून तहसीलदार, खंडाळा, यांनी योग्य माहितीबाबतचा अहवाल पंधरा दिवसात आयोगास द्यावा, असा आदेश सुनावणीच्या वेळीच दिला होता. या बाबतचा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, खंडाळा यांनी आयोगास त्वरित सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १३.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.हरिभाऊ शंकर सोनवणे
४६, रास्तापेठ, पुणे-४११०११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक(आस्थापना),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (सिंचन),
कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-५

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३३२ / पुणे /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१८.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.हरिभाऊ शंकर सोनवणे
४६, रास्तापेठ, पुणे-४११०११

**अपिलीय प्राधिकारी** तथा कृषी सहसंचालक(आस्थापना),
कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-४११००५

**जन माहिती अधिकारी** तथा कृषी उपसंचालक (सिंचन),
कृषी आयुक्त, महाराष्ट्र राज्य,पुणे-५

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ७.१०.२००५ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १३.१०.२००५ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.१२.२००५ |

| | | |
|---|---|---|
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.७.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>दि.२७.१.२०००, १२.४.२००४, २८.४.२००४, २७.६.२००४, २३.३.२००५, २.४.२००५, २३.४.२००५, ५.५.२००५, १७,६,२००५, १३.७.२००५, २१.९.२००५ या अर्जांवर विभागाने केलेल्या कार्यवाही माहिती द्यावी.(दि.२७.६.२००४ च्या अर्जामध्ये तक्रार कमिटीच्या अर्जाचा व कमिटीच्या निर्णयाची माहिती). जुनी खात्याची परीक्षा जी लागू केली होती, त्याचे नियमाची माहिती. ती परीक्षा शासनाने विहित केली असल्यास शासन निर्णयाची प्रत. लिपिक संवर्गाची ज्येष्ठतासूची (कोकण संभागाची) स्वतंत्र संवर्गाची ज्येष्ठतासूची , वरिष्ठ लिपिक, सहाय्यक अधीक्षक, व अधीक्षक पदाची ज्येष्ठतासूची व मानीव दिनांक देण्याबाबत तपासणी अधिकाराबाबत (शासनाच्या पत्र दि.६ जून २००२ नुसार कार्यवाही होणेबाबत). आयुक्त यांनी दि.२३.८.२००५ रोजी पाठविलेल्या पत्रावर कृषी सहसंचालक (आस्थापना ) यांनी काय कार्यवाही केली त्याचा तपशील | |

## विवेचन

कृषी विभागात अधीक्षक (वर्ग-३) या पदाची मानीव तारीख कृषी आयुक्तांनी नाकारल्याच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री.हरिभाऊ शंकर सोनवणे यांनी जन माहिती अधिकारी तथा कृषी उपसंचालक,(क.क.) कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे माहिती मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली परंतु ती अपुरी व चुकीची असल्याच्या कारणावरुन श्री.सोनवणे यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कृषी सहसंचालक (आस्था), कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे अपील केले. श्री.सोनवणे यांना मूळ अर्जानुसार संपूर्ण माहिती देण्यात आलेली आहे, तसेच मानीव दिनांकाच्या मागणीबाबत वेळोवळी त्यांना स्वतंत्रपणे कळविण्यात आले आहे, असे नमूद करुन अपिलीय प्राधिकारी तथा कृषी सहसंचालक(आस्था), कृषी आयुक्तालय यांनी अपील निकाली काढले. त्याविरुध्द श्री.सोनवणे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.सोनवणे यांचा मूळ अर्ज महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ अन्वये केलेला आहे, हा अधिनियम आता निरसित झाला असूनही आयोगाने त्यांचे अपील दाखल करुन घेतले.

श्री.सोनवणे कृषी खात्यातून अधीक्षक या पदावरुन दि.२९.२.२००४ रोजी सेवानिवृत्त झाले. तेव्हापासून मानीव तारखेबाबत कृषी आयुक्त कार्यालयाशी व अन्य पातळ्यांवर ते विविध अर्ज करीत आले आहेत. माहितीच्या अधिकाराखालील त्यांचा अर्ज व या संदर्भात वारंवार त्यांनी पाठविलेली पत्रे हा त्याचाच भाग आहे. त्यांनी मागितलेली कृषी विभागातील विभागीय लेखा परीक्षेच्या संदर्भातील माहिती १९६५ सालची आहे, त्यामुळे ती देण्यास काही कालावधी लागेल, असे जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यांना कळविले होते. त्यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली. परंतु प्रथम अपिलात व आयोगाकडील अपिलात त्यांनी अधिक माहिती मागितली. मूळ अर्जात समावेश नसलेली ही माहितीही देण्याचा प्रयत्न जन माहिती अधिकारी श्री.सो.द.शेलार व अपिलीय प्राधिकारी श्री.अ.ब.कवचाळे यांनी केला. मात्र मानीव तारीख मिळणे ही श्री.सोनवणे यांची मुख्य मागणी आहे व तसे त्यांनी सर्व पत्रव्यवहारात नमूद केले आहे. हा प्रशासकीय निर्णयाचा विषय असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

सन १९५९ व सन १९७३ च्या वर्ग-३ संवर्गाच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षेची नियमावली राजपत्रात प्रसिध्द केल्याचे आढळून येत नाही, असे दि.१७.२.२००६ च्या शासन पत्रान्वये कळविले आहे. त्या शासन पत्राची छायांकित प्रत श्री.सोनवणे यांना कक्ष अधिकाऱ्यांच्या सहीने देण्यात आली. परंतु ती महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणापुढे सादर करण्यासाठी आयुक्त, कृषी यांच्या स्वाक्षरीने मिळावी, अशी मागणी श्री.सोनवणे यांनी आयोगापुढील सुनावणीत केली . मूळ अर्ज, प्रथम अपील व आयोगापुढील अपील यात कोठेही अशी मागणी श्री.सोनवणे यांनी केलेली नसतानाही आयोगाने ती मान्य केली. अशी प्रत आयुक्त, कृषी यांच्या स्वाक्षरीने श्री.सोनवणे यांना देण्याचा आदेश दिला. त्यानुसार दि.४.२.२००८ रोजी आयुक्त, कृषी यांच्या स्वाक्षरीने अशी प्रत श्री.सोनावणे यांना पाठविण्यात आल्याचे आयुक्त, कृषी श्री.कृष्णा लव्हेकर यांनी आयोगाला कळविले आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२३.६.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे.१

श्री. सुभाष रामचंद्र सोनटक्के
आशीर्वाद, २७९३-अे, वरूण तीर्थ वेस,
कोल्हापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, जि. सिंधुदुर्ग

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग, जि. सिंधुदुर्ग

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | १३.५.२००८ |

**३. उपस्थित**

श्री. सुभाष रामचंद्र सोनटक्के
आशीर्वाद, २७९३-अे, वरूण तीर्थ वेस, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | १२.४.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २७.४.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | २६.५.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |

**८ मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

आम्रराई-रहाटेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात दि. ३०.३.१९९९ ते आजतागायत अशी एकूण चोवीस मुद्दयांची माहिती

## विवेचन

आमराई-रहाटेश्वर, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग येथील नळ पाणी पुरवठा योजनेच्या अनुषंगाने अपीलकर्ता श्री. सुभाष रामचंद्र सोनटक्के यांनी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडे २४ मुद्दयांची माहिती मागितली होती. जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविलेले शुल्क भरल्यानंतरही श्री. सोनटक्के यांना कोणतीही माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही. त्याविरूध्द श्री. सोनटक्के यांनी अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांच्याकडे अपील केले. परंतु या अपिलाचे उत्तरही जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनीच दिले. त्याविरूध्द श्री. सोनटक्के यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री. सोनटक्के हे ठेकेदार आहेत. निविदा शर्तीनुसार काम पूर्ण झाले की नाही, या संदर्भात शासन व श्री. सोनटक्के यांच्यात वाद असून, श्री. सोनटक्के यांना दंड करण्यात आला. तसेच त्यांची अनामत रक्कम व द्यावयाची ऊर्वरित रक्कम अदा करण्यात आली नाही. श्री. सोनटक्के यांनी मागितलेली माहिती आमराई-रहाटेश्वर येथील असली तरी एकूण अकरा योजनांच्या कामासंदर्भात हीच परिस्थिती असल्याचे कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सिंधुदुर्ग श्री. एन.बी. मोरे यांनी आयोगाला दि. ३.५.२००८ रोजी सादर केलेल्या निवेदनात नमूद केले आहे.

'सदरचे काम मी २००० मध्ये निविदेनुसार ९५ टक्के पूर्ण केले असताना व ऊर्वरित काम खात्याकडे अनुदान उपलब्ध न झाल्याने होऊ शकले नसताना त्याची जबाबदारी माझेवर ठेऊन मला खात्याने नाहक रू.२५००/- दंड केला आहे. तसेच वरील परिस्थितीत मी केलेले काम (अंदाजे रू.७०,०००/- ) अंतिम करून त्याचे अंतिम बिल तसेच माझी खात्याकडे असलेली सुरक्षा अनामत रक्कम रू. १७०००/- शासनचा दि. २६.८.१९७६ चा स्पष्ट आदेश असतानाही आजपर्यंत गेली ६ वर्षे मला देण्याची कोणतीही कार्यवाही केलेली नाही व मला नाहक आर्थिक अडचणीत आणलेले आहे,' असे श्री. सोनटक्के यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले आहे.

श्री. सोनटक्के यांनी दि. १२.४.२००६ रोजी माहिती मागण्याचा अर्ज दिला. सदरच्या प्रती मूळ नस्तीमध्ये उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरून देण्यात येणार आहेत, असे नमूद करून तत्कालीन जन माहिती अधिकारी म्हणून उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी

दि. २७.४.२००६ रोजी अपीलकर्त्यास शुल्क कळविले. श्री. सोनटक्के यांनी शुल्क भरल्यानंतर कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनीही जन माहिती अधिकारी म्हणून दि. २५.५.२००६ रोजी श्री. सोनटक्के यांना 'सदरहू योजनेच्या मूळ नस्तीवरून आपणास माहिती देणे आवश्यक असून मूळ नस्ती ह्या कार्यालयात उपलब्ध नाही. तरी मूळ नस्ती प्राप्त होताच यथोचित माहिती पाठविली जाईल,' असे कळविले. श्री. सोनटक्के यांनी त्याविरुध्द केलेल्या अपिलावरही कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग यांनी दि.७.६.२००६ रोजी उत्तर पाठविले व 'मूळ नस्ती प्राप्त होताच यथोचित माहिती पाठविली जाईल,' असे कळविले.

अपिलाच्या संदर्भात आयोगाने सर्व संबंधितांना माहितीच्या सद्यस्थितीबाबत दि. १८.९.२००७ च्या पत्रान्वये विचारणा केली होती. त्यानंतर दि. २८.९.२००७ च्या पत्रान्वये अपिलीय प्राधिकारी म्हणून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग यांनी श्री. सोनटक्के यांना काही माहिती पाठविली. परंतु एकूण चोवीस मुद्दयांपैकी केवळ दोन मुद्दयांची माहिती त्यात देण्यात आली असल्याचे श्री. सोनटक्के यांनी निदर्शनास आणले. त्यानंतर कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी अथवा अपिलीय प्राधिकारी यांनी केली नाही. यातील काही मुद्दे उदा. १७, १८, १९, २० कारणे, भाष्य अथवा स्पष्टीकरण यांची मागणी करणारे आहेत. परंतु अन्य मुद्दयांबाबतची माहिती व संबंधित कागदपत्रे श्री. सोनटक्के यांना देण्यात आली नाही. तसेच दिलेली माहितीही अपुरी असल्याचे व काही कागदपत्रांच्या - विशेषत: अपिलाच्या प्रती सुस्पष्ट व वाचता येण्यासारख्या नसल्याचे श्री. सोनटक्के यांनी निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकाऱ्यांनी मूळ नस्तीवरून कागदपत्रे देणार असल्याचे आधीच्या पत्रान्वये कळविण्यात आले व नंतर मूळ नस्ती सापडत नसल्याचे कळविले. नळ पाणी पुरवठा काम पूर्वी लघु पाटबंधारे विभागाकडे होते, नंतर ते ग्रामीण पाणी पुरवठा विभागाकडे सोपविण्यात आले. तेव्हाचे अधिकारी आता बदलले आहेत. तो विभाग बंद झाला असल्यामुळे तत्कालीन अधिकाऱ्यांशी चर्चा करून संबंधित कागदपत्रांचा शोध घेऊन ही माहिती द्यावी लागेल, असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा श्री. ए. बी. कागले यांनी नमूद केले. संबंधित मूळ नस्ती अद्याप शोधली गेलेली नाही व सन २००६ पासून ती का सापडत नाही, हे कळत नाही. शाखा अभियंता यांच्याशी संपर्क साधूनही मूळ नस्ती मिळाली नाही, असे श्री. कागले यांनी सांगितले. कामाच्या संदर्भात

आपल्याला एकरकमी दंड लावण्यात आला आहे हे चूक आहे. तो प्रतिदिन अशा स्वरूपात लावावा लागतो, तसे केलेले नाही, हे श्री. सोनटक्के यांचे म्हणणे श्री. कागले यांनी मान्य केले. मात्र दंडाची रक्कम माफ करणे किंवा संबंधित निर्णयाचे पुनर्विलोकन करणे हा अधिकार आपल्याला अथवा अन्य अधिकाऱ्यांना नसून जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा तो अधिकार आहे, असेही श्री. कागले यांनी स्पष्ट केले.

गेली आठ वर्षे आपली अनामत रक्कम अडवून ठेवण्यात आली असून अंतिम देयक प्रलंबित आहे, त्यामुळे आपल्याला फार मोठा आर्थिक व मानसिक ताण सहन करावा लागला आहे. वारंवार पाठपुरावा करूनही दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही आवश्यक ती माहिती मिळालेली नाही, त्यामुळे आपली कोंडी होत आहे, असे प्रतिपादन श्री. सोनटक्के यांनी केले. आपण केलेल्या पाठपुराव्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी पूरक कागदपत्रे सादर केली.

दंड माफ करणे, अनामत रक्कम अथवा अंतिम देयके अदा करणे हे विषय प्रशासकीय कार्यवाहीचे असून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत त्याची कार्यवाही येत नाही. मात्र संबंधित माहिती विहित मुदतीत व पूर्णपणे दिली जाणे आवश्यक होते. त्याबाबत तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी कोणतीही सकारात्मक कृती केलेली नाही, उलट टाळाटाळ केली आहे. शुल्क भरावयास सांगणे व भरल्यानंतर माहिती देता येत नसल्याचे कळविणे आणि शुल्कही परत न करणे यासारख्या कृतीतून नागरिकांच्या माहितीच्या अधिकाराबाबतची त्यांची बेफिकिरी दिसून येते. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मध्ये अभिप्रेत असलेल्या सार्वजनिक कारभारातील पारदर्शकतेच्या तत्त्वाला बाध आणणारी अशी ही वृत्ती व कृती आहे. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी. डी. चौगुले व श्री. एस. एस. कांबळे हे शास्तीस पात्र ठरतात.

या पार्श्वभूमीवर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. बी. डी. चौगुले व श्री. एस. एस. कांबळे यांनी शास्तीच्या अनुषंगाने आठ दिवसात आयोगाला खुलासा सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. परंतु पंधरा दिवस होऊन गेल्यानंतरही त्यांचा खुलासा आयोगाला प्राप्त झालेला नाही. याचा अर्थ त्यांना याबाबत काहीही म्हणावयाचे नाही, असा होतो.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यांचा विचार करून आयोग पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :

<u>आदेश</u>

१. अपील मान्य.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग श्री. बी. डी. चौगुले व श्री. एस. एस. कांबळे यांना रू. २५०००/- शास्ती लावण्यात येत आहे.

३. अपीलकर्त्यास प्रतिकात्मक नुकसान भरपाई म्हणून रू. १०००/- अदा करावेत. विहित मुदतीत व योग्य माहिती न देऊन अपीलकर्त्यास मानसिक त्रास देण्यास जबाबदार असलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून त्यांच्याकडून ही रक्कम वसूल करावी.

वरील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेकडून, तसेच संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेकडून शास्ती व भरपाईची रक्कम वसूल करणेची जबाबदारी ही मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,.सिंधुदुर्ग यांची राहील.

४. तत्कालीन सर्व संबंधितांशी संपर्क साधून अपीलकर्त्यास पंधरा दिवसात माहिती द्यावी. ही जबाबदारी विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची राहील.

५. अपीलकर्त्यास आकारलेले शुल्क रू. ५६/- परत करण्याची दक्षता तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग श्री. ए. डी. शिंदे यांनी घ्यावयास हवी होती, त्यांनी ती घेतलेली नाही. 'जन माहिती अधिकारी' या नात्याने अर्जांची हाताळणी केली असल्याने अपीलकर्त्यास ही रक्कम त्यांनी व्यक्तिशः परत करावी.

६. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, सिंधुदुर्ग श्री. ए. डी. शिंदे यांनी माहितीच्या मागणीची व अपिलाची विहित मुदतीत व गांभीर्याने हाताळणी केलेली नाही, त्याबद्दल त्यांना कडक समज देण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. ६ .६.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१.

श्री.संदिप तुकाराम शिंगाडे
रा.सर्व्हे नं.२९/४ब, भिमाशंकर कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे. अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा अपिलीय अधिकारी, उत्तरवादी
रयत शिक्षण संस्था, सातारा

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, रयत शिक्षण संस्था,
कर्मवीर समाधी परिसर, रविवार पेठ, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३४५ / पुणे / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१७.१.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.संदिप तुकाराम शिंगाडे
रा.सर्व्हे नं.२९/४ब, भिमाशंकर कॉलनी, पिंपळे गुरव, पुणे

**जन माहिती अधिकारी** तथा सचीव, रयत शिक्षण संस्था,
कर्मवीर समाधी परिसर, रविवार पेठ, सातारा डॉ.बी.एल.पाटील

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

ए.टी.डी.पदासाठी जाहिरात दिली गेली होती. दि.२.७.२००५ पर्यंत या पदासाठी अर्ज केलेल्या (एस.टी.) अनुसूचित जमाती या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना अद्यापपर्यंत कोणतेही मुलाखतीचे पत्र नाही, परंतु अन्य प्रवर्गातील काही उमेदवारांना नेमणुकीची पत्रे दिलेली आहेत.
(२)संबंधित ए.टी.डी. पदावरील (एस.टी.) या प्रवर्गातील उमेदवारांना नेमणुकीची पत्रे किंवा मुलाखतीची पत्रे दिली गेली असतील तर अशा उमेदवारांची नांवे, शैक्षणिक माहिती .

## विवेचन

रयत शिक्षण संस्थेत एटीडी उत्तीर्ण असलेल्या उमेदवारांकडून शिक्षण सेवक या पदासाठी दिलेल्या जाहिरातीनुसार अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवारांसह शिक्षण सेवक म्हणून केलेल्या नेमणुकांबाबतची माहिती अपीलकर्ता श्री.संदिप तुकाराम शिंगाडे यांनी जन माहिती अधिकारी तथा सचीव, रयत शिक्षण संस्था, कर्मवीर समाधी परिसर, रविवार पेठ, सातारा यांच्याकडे मागितली होती. माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून समाधानकारक माहिती न मिळाल्याच्या कारणावरुन श्री.शिंगाडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

वृत्तपत्रात जाहिरात देऊन संस्थेने अर्ज मागविले होते. जाहिरातीत अनुसूचित जमाती प्रवर्गासाठी काही पदे राखीव दाखविण्यात आली होती. परंतु या प्रवर्गातील उमेदवारांना मुलाखतीला बोलाविण्यात आले नाही व ती पदे भरण्यात आली नाहीत, असे श्री.शिंगाडे यांनी अपिलात म्हटले आहे. परंतु या प्रवर्गातील कोटा डीएड उमदेवार निवडीतून पूर्ण करण्यात आला. तसेच पुणे विभागातील दोन एटीडी रिक्त जागा इतर मागासवर्गीय व एक खुल्या प्रवर्गातून अशा भरण्यात आल्या.(एकूण आठ इतर मागासवर्गीय व इतर सहा खुल्या प्रवर्गातील). ही माहिती तयार होती. श्री.शिंगाडे हे संस्थेचे विद्यार्थी असल्यामुळे ते व त्यांच्या संघटनेचे काही कार्यकर्ते यांच्याशी चर्चा करुन सर्व माहिती त्यांना देण्यात आली. 'एटीडीच्या जागा निघाल्यास तुमच्या उमेदवारांबाबत आम्ही प्रामुख्याने विचार करु व त्यांना प्रथम पंसतीने नेमणूक देऊ,' असे बोलणे झाले. त्यामुळे स्वतंत्ररीत्या माहिती पाठविण्यात आली नाही, असे जन माहिती अधिकारी तथा सचीव, रयत शिक्षण संस्था, कर्मवीर समाधी परिसर, रविवार पेठ, सातारा डॉ.बी.एल.पाटील यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले, श्री.शिंगाडे यांनी ते मान्य केले. योग्य ती माहिती सर्व बाबींचा खुलासा करुन दिली असल्यामुळे आपली तक्रार राहिली नसल्याचे श्री.शिंगाडे यांनी तोंडी व लेखी निवेदन केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २३.६.२००८**